रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक २९
www.ramprahar.com
◆ किंमत ₹ २

शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८+४=१२

अंतरंग

भाजपच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा/२
गणेशोत्सवात आरोग्य, स्वच्छतेकडे दुर्लक्ष नको!/४
माणगाव तालुक्यातील इंदापुरात बांगलादेशी पकडले/५

## ढगफुटीमुळे जम्मू-काश्मीरमध्ये मृत्यूचे तांडव



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड़ जिल्ह्यातील चशोती गावात गुरुवारी (दि.१४) दुपारी १२:३० च्या सुमारास ढगफुटीची भीषण घटना घडली. या प्राकृतिक आपत्तीमुळे अचानक आलेल्या पुरामुळे ३२ जणांचा मृत्यू झाला असून, सर्व मृतदेह हस्तगत करण्यात आले आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. उपराज्यपालांनी शोक व्यक्त करत सिव्हिल, पोलिस, सेना, एनडीआरएफ आणि एसडीआरएफला बचाव कार्य तीव्र करण्याचे निर्देश दिले. सुरुवातीला १० मृत्यूंची नोंद झाली होती, जी नंतर १२, २०, २३ आणि आता ३२ पर्यंत वाढली. अनेकांची प्रकृती गंभीर आहे.

# मुंबईच्या विकासाला नवे पंख

### कोस्टल रोड आजपासून २४ तास खुला | लवकरच 'मुंबई फक्त ५९ मिनिटांत'

**मुंबई : प्रतिनिधी**

काही वर्षांपूर्वी आपण 'मुंबई विदिन ५९ मिनिट्स' हे स्वप्न पाहिले होते. हे स्वप्न आता लवकरच पूर्ण होणार आहे. मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारात असून वर्षाला किमान ५० किलोमीटरचे मेट्रो मार्ग पूर्ण होत आहेत. तसेच मुंबईतील कोस्टल रोड १५ ऑगस्टपासून नागरिकांसाठी २४ तास खुला असणार असून स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला मुंबईकरांसाठी या प्रकल्पांचे लोकार्पण करताना आनंद होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




वांद्रे येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पोडियम येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महापालिकेच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन व लोकार्पण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी उपस्थित होते. दरम्यान, विकासात कोणतीही तडजोड न करता, मुंबईच्या प्रगतीचा वेग अधिक वाढवू, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.

### एमएमआरडीए, बीएमसीच्या विविध प्रकल्पांचे लोकार्पण

७० कोटी रुपयांच्या मेट्रो प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. चेंबूर - सांताक्रुझ लिंक केबल स्टेड पूल, रोड भाग १ हा अशिया खंडातील १०० मीटर त्रिज्येचा सर्वात मोठा वक्राकार केबल स्टेड पूल आहे. कलानगर जंक्शन येथील आर्म डी उड्डाणपूल तसेच धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारा रस्त्यावरील ५.२५ कि.मी लांबीच्या विहार क्षेत्र, पादचारी भुयारी मार्गाचे लोकार्पण झाले.



## गव्हाण गावाला मिळणार नियमित मुबलक पाणी; सिडकोकडून आश्वासन

### नवीन स्वतंत्र पाईपलाईन देण्याची जनआक्रोश मोर्चात मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण गावाला नियमित पाणी पुरवठा करण्याच्या मागणीवरून गुरुवारी (दि.१४) आयोजित करण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चाला यश मिळाले. त्यानुसार गावाला आवश्यक असलेला पाणी पुरवठा करण्याचे सिडकोच्या वतीने आश्वस्थ करण्यात आले आहे तसेच या मोर्चाच्या अनुषंगाने गव्हाण गावाला हेटवणे पाणी पुरवठ्यातून नवीन स्वतंत्र पाईपलाईन टाकण्यात येण्याची मागणी या वेळी करण्यात आली असून येत्या पाच सहा दिवसांत सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात येणार आहे.

नवी मुंबई तसेच उलवे नोडचा विकास होत असताना त्यातील एक भाग असलेल्या गव्हाण गावात विविध समस्यांना लोकांना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जटील होत चालला आहे, त्यामुळे प्रथम पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी गव्हाण ग्रामस्थांचा सिडको प्रशासनाविरोधात जन आक्रोश मोर्चा झाला.

या मोर्चाला प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी सरपंच भाऊशेठ पाटील, माजी उपसरपंच विजय घरत, कोळी समाजाचे नेते विश्वनाथ कोळी, हेमंत ठाकूर, वसंत म्हात्रे, जयवंत देशमुख, अनंता ठाकूर, देशमुख समाज अध्यक्ष किरण देशमुख, आगरी समाज अध्यक्ष अशोक कडू, योगिता भगत, हेमंत पाटील, ऋषी कोळी, राजकिरण कोळी आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते.

गव्हाण ग्रामपंचायत कार्यालय येथून मोर्चाची सुरुवात होणार होती, त्या अनुषंगाने सर्व ग्रामस्थ त्या ठिकाणी एकत्रित झाले होते. या वेळी त्यांनी सिडको प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. गावाला दररोज जवळपास साडेतीन लाख लिटर पाण्याची गरज आहे, मात्र पाणी कमी दाबाने आणि कमी प्रमाणात सोडले जात असल्याने योग्य पुरवठा होत नाही. नियमित आणि मुबलक पाणी द्या, अशी गर्जनाही त्यांनी केली. या वेळी गावातील महिलांची उपस्थिती मोठी आणि लक्षणीय अशी होती.

दरम्यान, मोर्चा मार्गस्थ होण्याआधी सिडकोचे सहाय्यक अभियंता त्या ठिकाणी हजर झाले होते तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने हेदेखील या ठिकाणी दाखल झाले. त्यांनी यामध्ये मध्यस्थी केली. या वेळी सखोल चर्चा झाल्यानंतर गव्हाण गावाला मुबलक पाणी देण्याचे सिडकोकडून आश्वासन देण्यात आले. त्यानुसार आवश्यक पाणीपुरवठा करण्याचे आश्वस्थ करण्यात आले. कायमस्वरूपी तोडगा निघण्यासाठी गव्हाण गावाला स्वतंत्र नवीन पाईपलाईन आणि ती हेटवणे पाणी पुरवठ्यातून मिळण्याची मागणी या मोर्चाच्या अनुषंगाने करण्यात आली.

सर्वंकष चर्चा झाल्यानंतर येत्या पाच ते सहा दिवसांत सर्वपक्षीय मंडळींच्या सोबतीने सिडको अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्याचे प्रीतम म्हात्रे यांनी सूचित केले. त्यानुसार ही बैठक होऊन पिण्याच्या पाण्याचा कायम स्वरूपी मार्ग काढण्यात येणार आहे. त्यामुळे हा मोर्चा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला. नियमित पाणीपुरवठा होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## हाय सिक्युरिटी नंबर प्लेटसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) बसवण्यासाठी अखेर मुदतवाढ देण्यात आली असून, आता ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानंतर मात्र १ डिसेंबरपासून कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आरटीओ कार्यालयाच्या वतीने देण्यात आली. ही शेवटची संधी असल्याचे स्पष्ट संकेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) दिले आहेत.

राज्यभरात वाहनांची सुरक्षा आणि ओळख प्रमाणित करण्यासाठी HSRP बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अनेक वाहनधारकांनी अद्याप या नियमाची पूर्तता केलेली नाही. वाहनधारकांची ही उदासीनता आणि तांत्रिक अडचणी लक्षात



घेता, शासनाने पुन्हा एकदा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

१ डिसेंबर २०२५ पासून HSRP नसलेल्या वाहनांवर कडक कारवाईची मोहीम हाती घेतली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, असेही विभागाने काढलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.

## अलिबागच्या मांडवा येथे विदेशी दारूचा साठा जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

मांडवा सागरी पोलिसांनी अवैधरित्या विक्रीसाठी साठवून ठेवलेला विदेशी दारूचा प्रचंड साठा जप्त करून एकाला अटक केली आहे. ही कारवाई बुधवारी (दि.१३) दस्तुरी नाका, मांडवा येथे करण्यात आली.

गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दस्तुरी नाका येथे प्रकाश प्रेमनाथ जयस्वाल (३३, रा. दस्तुरी फाटा, मांडवा, मूळ रा. पटना, बिहार) हा संदिप बिअर शॉपीच्या मागे देशी व विदेशी दारूची अवैध विक्री करत आहे. त्यानंतर पोलिसांनी पंचांसह ठिकाणी छापा टाकून जयस्वाल यास ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातील पत्र्याच्या शेडमध्ये तपास केला असता, मॅकडॉल नंबर एक ओरीजनल, रॉयल ग्रीन व्हिस्की, डीलक्स ब्लॅक व्हिस्की, ओकस्मिथ गोल्ड, ब्लॅक अँड व्हाईट, ॲबसॉल्ट व्होडका, चिवास रिगल यांसह विविध ब्रँडच्या एकूण ९२१ दारूच्या बाटल्या सापडल्या. या मालाची एकूण किंमत १,१७,१८० एवढी आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या अधिपत्याखाली व पोलीस उपअधीक्षक जालिंदर नालकुल यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पुढील तपास पोसई सचिन वाणी करत आहेत.



**पनवेल :** राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी गुरुवारी प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील यांच्या पनवेल येथील संग्राम या निवासस्थानी भेट दिली. या वेळी मंत्री नाईक आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी 'दिबां'च्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी माजी खासदार डॉ. संजीव नाईक, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष सुनील घरत, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, भाजप खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल अध्यक्ष सुमित झुंझारराव, उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस रूपेश नागवेकर आदी उपस्थित होते.

## निवडक

### भारताकडून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर आणि इशारा

**नवी दिल्ली :** पाकिस्तानकडून सातत्याने केल्या जाणाऱ्या भारतविरोधी वक्तव्यांवर आता भारताने चोख प्रत्युत्तर दिले आहे. चुकीच्या पावलाचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा थेट इशारा भारताचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी गुरुवारी (दि.१४) पत्रकार परिषदेत पाकिस्तानला दिला आहे.

### भारताचे माजी हॉकीपटू डॉ. व्हेस पेस यांचे निधन

**कोलकाता :** भारताचे माजी हॉकीपटू आणि १९७२ म्युनिक ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचे सदस्य डॉ. व्हेस पेस यांचे गुरुवारी (दि.१४) कोलकातामध्ये निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. ते पार्किन्सन आजाराने ग्रस्त होते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी डॉ. व्हेस पेस यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

### ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी भारतीय जवानांचा आज सन्मान

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरमध्ये साहस आणि पराक्रम दाखवणाऱ्या भारतीय वायू सेनेच्या एकूण ३६ वायू सैनिकांना १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त वीरता पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. यात विंग कमांडर अभिमन्यू सिंह यांना शौर्य चक्राने गौरवले जाणार आहे. तसेच अन्य नऊ जवानांना वीर चक्र पुरस्काराने गौरवले जाणार आहे. तर २६ वायू सैनिकांना वायू सेना मेडलने सन्मानित केले जाणार आहे.






### आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा

# सुषमा पाटील विद्यालयात 'शाळा अंतर्गत' फेरी

## आंतरशालेय फेरीसाठी २५ विद्यार्थी पात्र




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या शाळा अंतर्गत फेरीचा उत्साह कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात उसळला होता. इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या २१५ विद्यार्थ्यांनी या फेरीत सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, इंटरनेट – वरदान की शाप?, प्लास्टिक मुक्त भारत, जर मी जादूगार असतो अशा विविध विषयांवर उत्कटतेने भाषण केले. उत्तम विषय मांडणी, देहबोली, स्पष्ट उच्चार आणि आत्मविश्वास याच्या आधारावर परीक्षकांनी गुणांकन केले. स्पर्धेच्या निकषांमध्ये विषयाची मांडणी व सुसंगता, देहबोली, स्वच्छ आणि स्पष्ट आवाज, वक्तशीरपणा, भाव आणि आवाजातील चढ-उतार अशी होती. स्पर्धेतील कठोर पण प्रेरणादायी वातावरणातून शेवटी २५ विद्यार्थी आंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता वाढली असून पुढील फेरीसाठी तयारी सुरू झाली आहे.

हा उपक्रम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनातून आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाउंडेशनच्या पुढाकारातून यशस्वीपणे राबवला जात आहे. विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षक, पालक आणि शाळा प्रशासनाचा मोलाचा वाटा आहे.

**काशिश फाउंडेशनचे आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा हा एक खूपच छान कार्यक्रम आहे. मी पहिल्या फेरीत प्रथम क्रमांक मिळवला. आता दुसऱ्या फेरीत वर्गांमधील स्पर्धा होणार आहे. हे देखील चांगले आहे कारण विद्यार्थी त्यांचा आत्मविश्वास कसा दाखवतात आणि बोलतात ते पाहता येते.मला आशा आहे की मी तिसऱ्या फेरीत निवडला जाईन. ते आम्हाला कसे बोलायचे आणि इतर अनेक गोष्टी शिकवतात. पहिल्या फेरीत त्यांनी आम्हाला पदकं, प्रमाणपत्र आणि भेटवस्तू दिल्या. ही भेटवस्तू खूपच छान व उपयोगी होती. मी तो बॅग सुद्धा वापरते.**

**–शरन्या काटे, इयत्ता ६वी, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे**

# खारघरच्या रामशेठ ठाकूर स्कूलचे टेबल टेनिस स्पर्धेत सुयश




**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका तर्फे जिल्हा स्तरीय टेबल टेनिस स्पर्धा वर्ष २०२५-२०२६ करिता बुधवारी (दि.१३) १७,१९ वर्षा खालील मुलांच्या स्पर्धा नवी मुंबई क्रीडा आणि सामाजिक विकास मंडल, सिडको समाज मंदिर, नवीन पनवेल तेथे झाल्या.

या स्पर्धेत साधारणतः ३० टीमने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होत चांगली कामगिरी केली. विद्यार्थी कृतीक शाह (१२-ए), प्रशिक अहिवले (९एच) यांनी वैयक्तिक सहभाग घेतला. त्यात ते विभागीय पातळीवर निवड चाचणीसाठी पात्र ठरले. तर १९ वर्षाखालील मुलांच्या टीमने टेबल टेनिस स्पर्धेत सहभाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेते पद पटकाविले.

या यशाबद्दल मुलांचे व क्रीडा शिशक शिक्षक अपूर्व अग्रवाल व नरेश ठोंबरे यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी मॅडम यांनी अभिनंदन केले आहे.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त 'सीकेटी'त विविध कार्यक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सी.के.टी विद्यालयाच्या इंग्लिश मीडियम प्राथमिक विभागातर्फे देशाच्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून गुरुवारी (दि.१४) विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संगीत शिक्षक रुपेश मढवी व संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. मान्यवरांच्या हस्ते शाळांतर्गत घेण्यात येणार्या विविध स्पर्धा, तसेच तालुका, जिल्हा, राष्ट्रीय स्तरातील कला व क्रीडा विभागात यश मिळविणार्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, मेडल देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी पनवेल महानगरपालिकेच्या माजी उप महापौर चारुशीला घरत, तसेच चांगू काना ठाकूर विद्यालय मराठी माध्यम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर तसेच इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधूरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी व इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे उपस्थित होत्या.

तुम्ही सर्व विद्यार्थी उज्वल देशाचे भवितव्यआहात तेव्हा एक सुजाण नागरिक बनून आपआपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या समजून घ्यायच्या आहेत आणि त्याचबरोबर देशाच्या विकासासाठी योगदान द्यायचे आहे, असे प्रतिपादन माजी उप महापौर चारुशीला घरत यांनी केले.

आज, आपण सगळे मिळून, 'माझ्या देशासाठी मी काहीतरी करून दाखवेन' असा संकल्प करूया असे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी आपल्या भाषणातून व्यक्त करत विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्वक मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन व आभार जसप्रीत सग्गु, अनघा भोसले व प्रिया नायर यांनी मानले. स्नेहल कडव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्याविष्काराचे सादरीकरण केले.

# गव्हाण विद्यालयात दहीहंडी जल्लोषात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या प्रांगणात बुधवारी (दि.१३) सायंकाळी विद्यार्थी व शाळा समितीच्या सदस्यांच्या साक्षीने दहीहंडी उत्सव झाला.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत व विश्वनाथ कोळी यांच्या हस्ते दहीहंडींचे पूजन करण्यात आले. स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, सुहास भगत व किशोर पाटील यांनी श्रीफळ वाढवले.

या वेळी गव्हाणच्या माजी सरपंच माई भोईर, सुधीर ठाकूर, इंदुताई म्हात्रे, जयश्री घरत आदी मान्यवरांसह प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, राजेंद्र चौधरी, सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थी गोविंद पथकांना रोख बक्षीसे दिली. गत पाच वर्षांप्रमाणेच विजय घरत यांच्यावतीने दहीहंडीसाठी या वर्षी दहा हजार रुपये रोख रक्कम आणि विजेत्या पथकांसाठी आकर्षक चषक वितरीत करण्यात आले. त्याचप्रमाणे ह्या शैक्षणिक वर्षात विद्यालयासाठी डिजिटल कॅमेरा देण्याचं त्यांनी घोषित केले व दहीहंडी उत्सवाची रक्कम दहा हजारांवरून २५००० रुपये देण्याचे जाहीर करून विद्यालयावरील स्नेह वृद्धी केली.

विद्यालयात पोस्टर प्रदर्शन, दहीहंडी सजावट, बासरी सजावट असे प्रदर्शन भरवण्यात आले.कलाशिक्षक गणेश भोईर यांनी अप्रतिम रंगसंगतीने रेखाटलेले कलात्मक फलक लेखन लक्षवेधी ठरले. मान्यवरांकडून रोख रकमेचे बक्षीस देऊन विद्यार्थ्यांच्या नृत्यशैली व नृत्यदिग्दर्शन कौशल्याचे कौतुक करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना विजय घरत यांचे वतीने अल्पोपहार देण्यात आला. सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी केले.



## अपघातात एकाचा मृत्यू; एक जखमी

**पनवेल :** जेएनपीटी हायवे क्रमांक ३४८ च्या मार्गावर मोटारसायकल चालकाने भरधाव वेगाने मोटरसायकल चालवून केलेल्या अपघातात चालकाचा मृत्यू झाला आहे तर सहकारी जखमी झाला असून या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मयूर कळसकर (वय २५) राहणार पुणे, याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल पनवेलजवळील जेएनपीटी हायवे क्रमांक ३४८च्या मार्गावर भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या डिव्हायडरला धडकून झालेल्या अपघातात तो जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला आहे. तर त्याच्या सहकारी विनायक तिलाखे (वय २५) रा. पुणे हा जखमी झाला आहे.

## चिपळे ते मोरबे खड्डे बुजविण्याची मागणी

**पनवेल :** चिपळे ते मोरबे रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. ते खड्डे ताबडतोब बुजविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. या रस्त्यावर चिपळे ते मोरबे गावाजवळ मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्डयांमुळे वाहनांची हानी होण्याची दाट शक्यता आहे. नागरिकांना रोज प्रवास करावा लागतो त्याच बरोबर वाहनचालकांना कसरत करून वाहन चालवयाला लागते. चिपळे ते मोरबे जाण्यायेण्यासाठी जास्त वर्दळ असते. त्याचप्रमाणे या रस्त्याची गणेशोत्सवपूर्वी डागडुजी करावी, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये जन्माष्टमी



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे गुरुवारी (दि.१४) श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव साजरा केला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आकर्षक वेशभूषा केली होती.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी पसायदानाचे अनेक फायदे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी त्याचे पठण केले आणि नित्यनेमाने त्यांनी ते करावे असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. याचबरोबर विद्यार्थ्यांनी प्रत्येक सणांचे मूळ कारण आणि महत्त्व समजून घ्यावे असेही त्या आपल्या भाषणामध्ये म्हणाल्या. विद्यार्थ्यांनी उत्सव आनंदाने साजरे करावे, असा सल्लाही दिला. या वेळी पर्यवेक्षिका सारिका लांजुरकर, नेहा खन्ना तसेच मिनल नाईक शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

# भाजपच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या उत्तर रायगड जिल्ह्याची कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली. त्यापार्श्वभुमीवर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि.१४) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्षपदी चंद्रकांत घरत, सरचिटणीसपदी नितीन पाटील चारुशीला घरत, चिटणीसपदी रविनाथ पाटील तसेच कोप्रोलीचे माजी सरपंच रमेश पाटील आणि वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील यांची रायगड जिल्हा भाजपा सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांनी अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, कामगार नेते सुरेश पाटील, सुधीर घरत, महिला मोर्चाच्या प्रभाग अध्यक्षा सुजाता पाटील, शक्ती प्रमुख कमलाकर घरत, अर्चित घरत, कल्पना पाटील, सरोज मोरे, प्रभा सिन्हा, मेघा ढमाल, पुष्पलता पाटील, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटिल, अंकुश पाटील, महेश शाह, सीमा घरत आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.














## सीकेटी विद्यालयात दहीहंडीचा जल्लोष

**पनवेल :** तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयाच्या इंग्लिश मीडियम पूर्व प्राथमिक विभागातर्फे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.१४) दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले.

प्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या हस्ते दहीहंडीचे पूजन करण्यात आले. बालगोपालांनी गोविंदा आला रे आला......या गाण्यावर नृत्याचा मनमुराद आनंद घेतला. दरम्यान, शाळेत बांधण्यात आलेली दहीहंडी श्रीकृष्ण रूपातील बालकांनी बासरीच्या मदतीने फोडून गोपाळकाला सण साजरा केला. विद्यार्थ्यांना दही-पोहे व फळांचा प्रसाद देण्यात आला.

या कार्यक्रमासाठी मराठी माध्यमाच्या प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधूरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होते.

अश्या प्रकारे सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे, सणांचे शाळेमार्फत आयोजन केल्याने पालकांनी शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकांचे आभार मानले.

















## संपादकीय

# गंभीर आणि आक्षेपार्ह

एकीकडे आपल्या राजकारणाचा भाग म्हणून अमेरिका पाकिस्तानला प्यादे म्हणून वापरू पाहाते आहे आणि पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनी अमेरिकेच्या आधाराने फुशारून भारतावर क्षेपणास्त्र डागण्याची तसेच अर्ध्या जगाला उद्ध्वस्त करण्याची वल्गना केली आहे. एकंदरच हा सगळा अमेरिकेच्या दुटप्पी राजकारणाचा भाग आहे हे लपून राहात नाही.

**अमेरिकेने नुकतेच 'बलोच लिबरेशन आर्मी'ला दहशतवादी संघटना म्हणून जाहीर केले. अमेरिकेचा हा निर्णय पाकिस्तानच्या फायद्याचा असला तरी अमेरिकेचा या निर्णयामागील नेमका हेतू काय असा प्रश्न पडतो. दुसरीकडे, व्यापारी आणि मानद वाणिज्यदूत अदनान असद यांनी टाम्पा येथे आयोजित केलेल्या ब्लॅक-टाय डिनरमध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर उपस्थितांना म्हणाले की आपण एक अणुशक्ती-संपन्न राष्ट्र आहोत. जर आपल्याला वाटले की आपण बुडत आहोत, तर आपण अर्धे जग आपल्यासोबत घेऊन बुडू. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताला धमक्या देणाऱ्या पाकिस्तानच्या मुनीर यांच्यावर अमेरिकेतूनच टीका झाली आहे. पेंटागॉनचे एक माजी अधिकारी मायकल रुबिन यांनी मुनीर म्हणजे गणवेशातला ओसामा बिन लादेन अशी बोचरी टीका केली आहे. पाकिस्तानला कितीही सूट दिली तरी त्यांच्या विचारात बदल होणार नाही असेही रुबिन यांनी म्हटले आहे. खरे तर भारत आणि पाकिस्तान यांची सुरूवात सोबतच झाली. पण स्वातंत्र्यानंतर ७८ वर्षांनी आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे आणि पाकिस्तान एक आर्थिकदृष्ट्या जर्जर झालेला देश. अमेरिकेचा दुटप्पी राजकारणातून पाकिस्तानला हाताशी धरण्याचा डाव हा आगीशी खेळ ठरू शकतो. म्हणूनच मुनीर यांच्या या धमकीवजा विधानावर, पाकिस्तानला दहशतवादाला पुरस्कृत करणाऱ्या देशांच्या यादीत टाकावे अशी मागणी मायकल रुबिन यांनी केली आहे व पाकिस्तानकडून असलेल्या धोक्याविषयी त्यांनी अमेरिकी राज्यकर्त्यांना सावध करण्याचा प्रयत्नही केला आहे. पाकिस्तान अण्वस्त्रे असलेला एक बेजबाबदार देश आहे हेच मुनीर यांच्या विधानातून दिसून येते अशी अतिशय योग्य प्रतिक्रिया भारताने या विधानावर व्यक्त केली. अण्वस्त्रांचा ब्लॅकमेलिंगसाठी वापर करण्याची पाकिस्तानची पद्धत जुनीच आहे. परंतु भारत अशा ब्लॅकमेलिंगला बळी पडणार नाही व स्वत:च्या राष्ट्रीय सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलत राहील असे आपल्या परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे. अशा प्रकारच्या अत्यंत बेजबाबदार वक्तव्याची दखल संपूर्ण जागतिक समुदायाने घ्यायला हवी, अशी अपेक्षाही भारताने व्यक्त केली आहे. विशेषत: संयुक्त राष्ट्रांनी याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. खरे तर अमेरिका नेहमी आपण दहशतवादाच्या विरोधात असल्याचे प्रतिपादन करते. परंतु त्याच अमेरिकेच्या भूमीवरून मुनीर भारतासोबतच अर्ध्या जगाला उद्ध्वस्त करणयाची भाषा करतात हे अत्यंत गंभीर आहे. पाकिस्तानची अण्वस्त्रे ही कोणत्याही दहशतवादी गटांच्या हाती लागू नयेत म्हणून भारतानेच नव्हे तर जागतिक समुदायाने योग्य ती काळजी घेण्याची गरज आहे. पाकिस्तानकडून अशाऱ्हेने शेजारी राष्ट्राला धमक्या दिल्या जातात आणि अमेरिकी प्रशासन त्याविरोधात कोणतीही कारवाई करत नाही हे अत्यंत खेदजनकच म्हटले पाहिजे. आपल्याला हव्या त्या व्यापारी तडजोडी करण्यास भारत तयार नसल्याचे दिसून आल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे असले डाव खेळायला सुरूवात केली आहे हेही उघडच आहे. म्हणूनच हे असले डावपेच हाणून पाडणेच योग्य ठरेल.**

# गणेशोत्सवात आरोग्य, स्वच्छतेकडे दुर्लक्ष नको!

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

गणेशोसत्सव हा कोकणतील सर्वात मोठा सण. या सणासाठी आता १२ दिवस उरले आहेत. गणेशभक्त गणेशाच्या आगमनासाठी उत्सुक आहेत. या सणासाठी चाकरमणी मोठ्या प्रमणावर आपल्या मुळगावी येणार आहेत. यासाठी आता प्रशासनदेखी सज्ञ झाले आहे. गणेशोत्सवासाठी काही दिवस आहेत असे असताना प्रशासानाने गणेशभक्तांच्या स्वगताचे व त्यांचा प्रवास सुखकर होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचे नियोजन करून ठेवले आहे. प्रशासनाने गणेशोत्सवात गणेशभक्तांच्या प्रवसासाठी आणि सुरक्षेकडे लक्ष दिले जात असताना आरोग्य व स्वच्छतेकडे दुर्लक्ष व्हायला नको. जिल्हा प्रशासनाने त्याकडे देखील लक्ष दिले पाहिजे.

गणेशोत्सव २७ ऑगस्टपासून सुरू होत आहे. कोकणात घराघरात गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करुन गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. गणेशोत्सवासाठी चाकरमानी मोठ्या संख्येने आपापल्या गावी परततात. या वेळी चाकरमानी खासगी वाहनांचा वापर मोठ्या संख्येने करतात. या काळात मुंबई-गोवा महामार्गावरील वर्दळीत नेहमीपेक्षा दहा ते बारा पटीने वाढ होते. त्यामुळे वाहतुक कोंडी तसेच इतर समस्यांचा सामना चाकरमान्यांना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर चाकरमान्यांचा रायगड जिल्ह्यातील प्रवास सुखकर आणि विनाव्यत्यय व्हावा, यासाठी राज्य सरकारसह जिल्हा प्रशासनाने चोख व्यवस्था केली आहे. जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्ग हद्दीत प्रवास सुखकर आणि विनाव्यत्यय व्हावा, वाहतुक कोंडी टाळण्यासाठी गृह विभागाने मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांना बंदी केली आहे. तसेच जिल्हा पोलीस विभागामार्फत पोलीस अधिकारी कर्मचारी, वॉर्डन, होमगार्डचा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. महामार्गावर क्रेन, रुग्णवाहिका, मॅकॅनिक तैनात करण्यात येणार आहेत.

मुंबई-गोवा महामार्ग तसेच पालीफाटा-वाकण महामार्गावर रायगड जिल्ह्यातील भागात वाहतुक कोंडी होऊ नये यासाठी योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये सात उपविभागीय पोलीस अधिकारी, २२ पोलीस निरीक्षक, ७२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ७६२ पोलीस कर्मचारी व होमगार्डचा समावेश आहे. यासह राज्य राखीव दल, शीघ्र कृती दल, महामार्ग पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत. त्यांना वाहतुक सुरळीत ठेवण्यासाठी योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. महामार्गावर तैनात असलेल्या पोलीसांना गस्तीसाठी जीप व मोटारसायकल देण्यात येणार आहेत. तसेच पोलिसांना एकमेकांसोबत तसेच नियंत्रण कक्षासोबत संपर्क साधण्यासाठी ७४ बिनतारी संच देण्यात येणार आहेत.

महामार्गावर एखादा अपघात झाला किंवा गाडी बंद झाल्यास ती महामार्गा वरून हटवण्यासाठी २० क्रेन ठेवण्यात येणार आहेत. तसेच अपघातात कोणी जखमी झाल्यास २० रुग्णवाहिकांच्या फेर्याही महामार्गावर चालू राहणार आहेत. या रुग्णवाहिकांमध्ये डॉक्टर, परिचारिका असणार आहेत. जिल्ह्यातील सर्व सरकारी दवाखान्यांमध्ये सर्व यंत्रणा सज्ञ ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. वेळप्रसंगी अपघातग्रस्तांवर खासगी रुग्णालयांमध्ये उपचार करण्याची तयारी सुरू आहे. तसेच महामार्गावर एखादे वाहन बंद पडल्यास ते दुरुस्त करण्यासाठी मॅकॅनिकही ठेवण्यात येणार आहेत. गणेशोत्सव काळात २३ ऑगस्ट रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते २९ ऑगस्ट तसेच २ सप्टेंबर ते ४सप्टेंबर आणि ६ ते ८ सप्टेंबर या काळात १६ टन व त्यापेक्षा अधिक वजनाच्या अवजड वाहनांना बंदी करण्यात आली आहे. यामधून दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाक गॅस सिलिंडर, लिक्वीड मेडिकल ऑक्सिजन, अन्नधान्य, भाजीपाला व नाशवंत माल इत्यादी जिवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना सूट देण्यात आली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर वाहतुक कोंडी होऊ नये, चाकरमान्यांचा प्रवास विना अपघात, सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. मात्र महामार्गावर सर्वत्र मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, त्यामुळे वाहतुक कोंडीचा सामना चाकरमान्यांना करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने हे खड्डे बुजवून हा माहामार्ग वाहतुकीसाठी सुरक्षीत केला पाहिजे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेणेशोत्वावाच्या कालावधीत गावागात मोठ्या प्रमाणात चाकरमणी येणार आहेत. त्यांच्या आरोग्याची देखील काळजी घ्यावी लागणार आहे. प्रथमिक आरोग्यकेंद्रांमध्ये मुबलक औषधे उपलबध्द करून दिली पाहिजेत. या कालावधीत ग्रामीण भागत कचार व्यववस्थापनाची उपाययोजना करायला वही. मुख्य रस्ते व गाव परिसरातील साठलेल्या कचर्याचे योग्य निर्गतीकरण करण्याची व्यवस्था व्हायला हवी. कचार कुजल्यानंतर होणार्या दुर्गंधीतनू रोगराई पसरू शकते. आरोग्य धोक्यात येऊ शककते. त्यामुळे दर्गंधी थांबविण्यासाठी व कचर्यावरा लवकर उलण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे. कचर्याचे ढिग होणार नाहित यासाठी कचरा व्यवस्थापन व्हायला हवे. पुजेतील निर्माल्य हे नैसर्गिक जल स्त्रोतात विसर्जित न करता निर्माल्यासाठी मंगल कलश तयार करणे आवश्यक आहेत. त्याची जबाबदारी प्रत्यके ग्रामपंचयातीर सोपवायला हवी.

# मोरपीस! निःशब्द मोरपीस...!

जादूची कांडी फिरवल्यानंतर आपल्याला हवं ते साध्य होतं; त्याचप्रमाणे मोरपीस फिरविल्यानंतरही मनासारख्या गोष्टी घडू लागतात. म्हणून मोरपीस म्हणजे जादूची कांडीच असं म्हणायला काही हरकत नाही. जादूची कांडी ही केवळ परीकथेच पहायला मिळते. असं असलं तरी या मृगजळापलीकडे विचार केला तर नक्कीच जाणवेल की, मोरपीस फिरविल्यानंतर हवं ते साध्य होतं. फक्त तुमच्या आयुष्यातील ते मोरपीस कोणतं ते ओळखता यायला हवं.

शालेय जीवनात अनेकांना वहीमध्ये मोरपीस दडवण्याची सवय असते, पण तेव्हा कुणालाच माहिती नसतं असंच एखादं अमूर्त मोरपीस आयुष्याला कलाटणी देऊन जाईल.

ज्याला आपण श्याम म्हणतो त्या कृष्णाची मूर्ती समोर आली की, डोळ्यासमोर तरळते ती म्हणजे बासरी आणि मोरपीस. कधी-कधी वाटतं या मोरपिसामुळेच कान्हाच्या बासरीमध्ये सुरांची जादू भरली गेलीये आणि अख्या जगाला कान्हाच्या बासरीचं वेड लागलंय.

अशाच एका मोरपीसामुळे एका क्षणी आयुष्याचा खरा अर्थ उमगला. नव्हे-नव्हे जादूच झाली. एकेकाळी लिहिण्याची खूप इच्छा असताना लेखणी हातात घेतल्यावर काय लिहू? अशा संभ्रमात असणाऱ्या मला. माझ्या मनातल्या 'तू'मुळे एक नवी दिशा मिळाली.



माझ्या मनातला 'तू' कधी दृश्य रुपात अस्तित्वात येशील की,नाहीस मला माहिती नाही, पण तू फिरविलेल्या त्या जादूच्या कांडीमुळे आता लिहिणं सहज शक्य झालंय. खरं सांगू का? जोपर्यंत मी तुला माझ्या मनात घोळवत नाही तोपर्यंत लेखणी पुढे सरकतच नाही.

रंग, रूप, आवाज नसलेल्या तुझ्या अस्तित्वाला एक चेहरा आहे सोज्वळतेचा.निरागस भावबंधातील जाणिवांचा. तुला कागदावर उतरवताना प्रत्येक वेळी तू मला नवा भासतोस. काल जो होता तो तू आजपेक्षा खूप वेगळा असतोस तरीही हवाहवासा वाटतोस. हरेक साहित्यकृतीतून तुझ्या अस्तित्वाचा निराळा पैलू उलगडतोस. आजवर खूप लिहिलंय तुझ्यावर, तरीही तू किती शांत आहेस. अबोल आहेस. कधी वाटतं तुझ्या या मौनाचीही एक भाषा आहे. ही भाषा समजून घेताना तुझं हेच निःशब्द रूप मला लिहिण्यास भाग पाडतं. काव्यातल्या नऊ रसांप्रमाणे तू ओघळतोस लेखणीतून. प्रत्येक साहित्यकृती नवीन, पण उगमस्थान मात्र तूच. तुझ्यावर लिहिता-लिहिता मी मलाच नव्यानं गवसले आहे. तुझ्याशिवाय माझं लिहिणं अपूर्ण आहे. म्हणून तुला मी मनामध्ये तेवत ठेवणार आहे. मला पूर्णत्वाकडे नेण्यासाठी. तुझ्या रूपातलं माझ्या आयुष्यातील अमूल्य मोरपीस ठेव म्हणून जपणार आहे, कारण तुझ्याशिवाय साहित्यकृती अन् साहित्यकृतीविना मी अपूर्ण आहे.

*निरपेक्ष अनुराग मोरपीस*
*अवर्णनीय सौंदर्य मोरपीस*
*सप्तरंगी इंद्रधनू मोरपीस*
*अवीट नादब्रम्ह मोरपीस*
*निस्सीम भक्ती मोरपीस*

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

# 'या' प्रसिद्ध स्मार्टफोनवर मिळेल बंपर सूट

स्मार्टफोन खरेदी करण्याचा प्लानिंग करणाऱ्यांसाठी सर्वोत्तम संधी आहे. सध्या सॅमसंग गॅलेक्सी एस २४ अल्ट्रा फोन अगदी स्वस्त दरात खरेदी करता येणार आहे. अमेझॉन आणि फ्लिपकार्टचा सेल सुरु आहे. या सेलमध्ये हा फोन मोठ्या सवलतींसह खरेदी करता येतो. या फ्लॅगशिप फोनची मूळ किंमत आता ८०,००० रुपयांपेक्षा कमी झाली आहे. तर जेव्हा तो बाजारात लाँच झाला तेव्हा त्याची किंमत १,३०,००० रुपये ठेवण्यात आली होती, म्हणजेच तुम्ही सुमारे ५०,००० रुपयांची बचत होणार आहे.



Samsung Galaxy s24 Ultra हा फोन भारतात १२ जीबी रॅम आणि २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंटसह लाँच करण्यात आला. या फोनची स्टार्टिंग किंमत १,२९,९९९ रुपये इतकी होती, परंतु सध्या अमेझॉन आणि फ्लिपकार्टवर सुरू असलेल्या सेलमध्ये या फोनवर सुमारे ५०,००० रुपयांची सूट मिळत आहे. अमेझॉनवर २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंटची किंमत ८०,४९० रुपये आहे, तर हाच व्हेरिएंट फ्लिपकार्टवर ८१,९८० रुपयांना खरेदी करता येईल. तथापि, फ्लिपकार्टवर, फ्लिपकार्ट ॲक्सिस क्रेडिट कार्डने पेमेंट केल्यास ४,००० रुपयांची अतिरिक्त त्वरित सूट उपलब्ध आहे, ज्यामुळे या फोनची वास्तविक किंमत ८०,००० रुपयांपेक्षा कमी होते.

यात ६.८-इंचाचा क्वाड HD+ डायनॅमिक -MOLED डिस्प्ले आहे. या फोनमध्ये गोरिल्ला ग्लास आर्मर प्रोटेक्शन आहे. या फोनमध्ये स्नॅपड्रॅगन ८ Gen ३ प्रोसेसर, २००MP शक्तिशाली कॅमेरा देण्यात आला आहे. यात टायटॅनियमची बॉडी आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सॅमसंग या फोनला सहा वर्षांसाठी सॉफ्टवेअर आणि सुरक्षा अपडेट देईल, जेणेकरून तो बराच काळ नवीन आणि सुरक्षित राहील. जर तुम्ही विश्वासार्ह आणि शक्तिशाली स्मार्टफोन शोधत असाल तर ही डील तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. हा फोन सध्या One UI ७वर चालत आहे, जो Android १५वर आधारित आहे.

# भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो!

भारतात स्वातंत्र्य दिन दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिवस स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. सरकारी आणि खासगी कार्यालये तसेच बँका, शाळा आणि महाविद्यालये आणि देशातील इतर सर्व संस्थांसाठी ही राष्ट्रीय सुट्टी असते. यंदा देशाच्या स्वातंत्र्याचा ७८वा वर्धापन दिन आपण साजरा करीत आहोत.

दरवर्षी १५ ऑगस्ट हा दिवस भारतीयांसाठी अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. ही राष्ट्रीय सुट्टी असल्याने ध्वजारोहण समारंभानंतर सर्व प्रादेशिक, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील सरकारी कार्यालये बंद राहतात. व्यावसायिक दुकानेही बंद राहू शकतात किंवा ऑपरेटिंग तास कमी केले जाऊ शकतात, तर अत्यावश्यक सेवा सुरू असतात. देशभरातील शाळा आणि महाविद्यालये विद्यार्थी आणि पुरस्कार विजेत्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करतात. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. कलाकार त्यांच्या लपलेल्या प्रतिभेचे प्रदर्शन करण्याची आणि ओळख आणि पुरस्कार मिळवण्याची ही संधी मिळवतात. काही ठिकाणी स्वातंत्र्यदिनी स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांचा गौरव केला जातो.




**निमित्त**


भारतीय स्वातंत्र्य कायदा १९४७ हा १५ ऑगस्ट १९४७ रोजी युनायटेड किंगडम (यूके) संसदेने शासन केला. न्यायालयीन सार्वभौमत्व भारतीय संविधान सभेकडे हस्तांतरित करण्यात आले. किंग जॉर्ज सहावा, राणी एलिझाबेथ दुसरी हिचे वडील, संपूर्ण रिपब्लिकन संविधानात देशाचे प्रसारण पूर्ण होईपर्यंत राज्याचे नेतृत्व करत राहिले.

राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश प्रशासनापासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारताने कठोर संघर्ष केला. भारत १५० वर्षांहून अधिक काळ ब्रिटीशांच्या ताब्यात होता. देशाला परकीय राज्यकर्त्यांपासून स्वातंत्र्य मिळवायचे होते. १८५७मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या कायद्याच्या विरोधात, पहिले धर्मयुद्ध झाले. पुढे भारताच्या स्वातंत्र्याच्या मोहिमेला भारतीय विद्रोह, १८५७चे विद्रोह, महान बंड आणि भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध अशा अनेक नावांनी बोलावले गेले.

स्वातंत्र्य दिनाचे एक अतिशय महत्त्वाचे प्रतीक म्हणजे दिल्लीतील लाल किल्ला. हे ते ठिकाण आहे जिथे १५ ऑगस्ट १९४७ रोजी पहिल्या भारतीय पंतप्रधानांनी भारतीय ध्वजाचे अनावरण केले होते. भारताचे पंतप्रधान दरवर्षी स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावर भारतीय ध्वज फडकवतात. त्यानंतर पंतप्रधान भारतातील लोक, त्यांचे बलिदान, उपलब्धी, आव्हाने, तसेच सरकारच्या देशासाठी असलेल्या दूरदृष्टीची माहिती देऊन भाषण करतात. राष्ट्रध्वज फडकवणे हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून देशाच्या विकासाचे तसेच ब्रिटीश राजवटीच्या अंताचे प्रतीकात्मक अभिव्यक्ती आहे. लाल किल्ल्यावर होणारा कार्यक्रम हा भारत स्वतंत्र व्हावा म्हणून ज्यांनी आपले प्राण दिले त्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहण्याचा एक मार्ग आहे. सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा! **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# दिवसातून 'या' पाच वेळेत प्या पाणी!

आपल्या शरीराचा ७० ते ७५ टक्के भाग हा पाण्याने व्यापला आहे. त्यामुळे सुदृढ आरोग्यासाठी पाण्याशिवाय पर्याय नाही. डोक्यावरील केसांपासून ते पायांवरील नखांपर्यंत सर्व अवयव निरोगी ठेवण्यासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.



आयुर्वेदानुसार, पाणी केवळ तहान भागवणारे नाही तर ते एकप्रकारे औषध आहे. ते शरीराचे कार्य सुरळीत करते. योग्य पद्धतीने पाण्याचे सेवन केल्यास आरोग्य निरोगी राहते, शरीरास ऊर्जा मिळते. यामुळे रोज योग्य वेळी पाणी प्यायल्यास एखाद्या व्यक्तीला खरोखरच बरे होण्यास मदत होऊ शकते, असे डॉ. चौहान म्हणाले.

सकाळी झोपेतून उठल्यानंतर इतर काहीही करण्यापूर्वी रोज एक ग्लास कोमट पाणी प्या. यामुळे तुमच्या शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते. पचनाक्रिया सुधारते, दिवसभर मन एकाग्र राहते.

जेवणापूर्वी सुमारे १०-२० मिनिटे आधी थोडे कोमट पाणी प्या. त्यामुळेही तुमची पचनक्रिया सुरळीत होण्यासाठी अग्नि (पाचक अग्नी) तयार होण्यास मदत होते. जेवताना किंवा जेवणानंतर लगेच जास्त पाणी पिऊ नका, कारण यामुळे पचनक्रियेवर परिणाम होतो.

जेवणानंतर पोषकतत्त्वांचे शोषण आणि हलके डिटॉक्सिफिकेशन सुलभ करण्यासाठी तुम्ही एक छोटा ग्लास कोमट पाणी पिऊ शकता, यामुळे खाल्लेलं अन्न चांगल्या प्रकारे पचते. अशा प्रकारे दिवसभराचे पाणी पिण्याचे वेळापत्रक फॉलो करा, याशिवाय तुम्हाला खूप जास्त तहान लागते तेव्हा पाणी पिणे गरजेचे आहे. जर तुम्ही सतत एक एक घोट असे पाणी पित असाल तर यामुळे कफ ऊर्जेचे असंतुलन होऊ शकते आणि कदाचित तुम्हाला अस्वस्थ, जड किंवा आळसवाणे वाटू शकते.

अंघोळीच्या एक तास आधी एक छोटा ग्लास पाणी प्यायल्यास रक्ताभिसरण क्षमता सुधारण्यास मदत होते. तसेच झोपण्यापूर्वी एक छोटा ग्लास पाणी प्यायल्यास मज्जासंस्थेला स्थिर करण्यास मदत होते, यामुळे रात्रभर झोपेत असताना शरीर चांगल्याप्रकारे रिचार्ज होऊ शकते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# अलिबाग शिक्षक पतपेढीचे कार्य कौतुकास्पद –आमदार प्रवीण दरेकर

**महाड : प्रतिनीधी**

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लिमिटेड अलिबाग च्या वतीने पाककला व रांगोळी स्पर्धा महाड येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक बहुउद्देशीय हॉल येथ झाला या प्रसंगी आमदार प्रविण दरेकर यांनी शिक्षक पतपेढी संचालकांच्या कामगीरीचे कौतुक केले.



यावेळी व्यासपीठावर आ प्रविण दरेकर, तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी राजन सुर्वे, अलिबाग पतपेढीचे विद्यमान चेअरमन तथा शिक्षक परिषद राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, राज्य प्रसिद्धी प्रमुख वैभव कांबळे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष उदय गायकवाड, व्हा. चेअरमन प्रतिभा पाटील,सौ रेश्मा धुमाळ मु, मानद सचिव देवानंद घोगर, जिल्हा कार्यवाह विजय पवार, सदर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाचे नेते तथा मुंबई बॅक चेअरमन आमदार प्रवीण दरेकर यांनी पाककला किंवा रांगोळी असो शिक्षकांच्या हाताला एक प्रकारची कला असते कारण शिक्षक हा सर्व विद्यार्थ्यांच्या कलागुणानुसार त्याला अध्यापन करत असतो आपल्या वर्गातील विद्यार्थी अनेक प्रकारचे असतात तरी त्या विद्यार्थ्यांना आपल्या चांगल्या कलेतून सदर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवितात त्यामुळे शिक्षकांना कला हा विषय काही नवीन नाही शिक्षक हा कला संपन्न असतो. असे नमूद करुन राज्यातील शिक्षकांच्या प्रश्नाविषयी विधानपरीषदेमध्ये भूमिका मांडणार व तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेब यांच्या समवेत शिक्षकांच्या प्रश्नाविषयी मीटिंग घेऊन शिक्षकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार अशी ग्वाही दिली.

राज्यातील शिक्षकांच्या सहकारी पतसंस्थाना देखील आपण मदत करणार. असल्याचे त्यांनी सांगितले.

## मांदाड ते मांदाडपुलपर्यंतच्या रस्त्यावरील खड्डे भरण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील तळा – मांदाड– आगरदांडा या रस्त्यावरील मांदाड– मांदाड पुल (खाजणी) रस्त्या दरम्यान अंदाजे १ की.मी. रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असल्याने वाहनचालक व प्रवासी वर्गातून सदर रस्त्यावरील खड्डे भरण्याची मागणी होत आहे.



तळा तालुक्यासाठी सहा तालुक्यांना जोडणारा हा मांदाड पुल असून या पुलावरून मुरुडकडे अनेक प्रवासी या मार्गावरून प्रवास करत असतात मात्र या मार्गावर मांदाड गाव ते पुलापर्यतच्या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्याने वाहनचालकाला वाहन चालविताना मोठी कसरत करून वाहन चालवावे लागते तरी सदर रस्त्यावरील खड्डे त्वरीत भरावे अशी मागणी प्रवाशी वर्गातून होताना पहावयास मिळत आहे.

रस्त्याचे खड्डे गणेशोत्सवापुर्वी भरून डागडूजी करावी व सदर रस्ता होण्यास ज्या कोणत्या अडचणी असतील त्या अडचणी दूर करून लवकरात लवकर या रस्त्याचे काम व्हावे अशीही अपेक्षा केली जात आहे.

## रेवदंडा येथे भरधाव कारवर पोलिसांची कारवाई

**रेवदंडा: प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेतून भरधाव वेगाने स्विप्ट कार चालवित असलेल्या वाहन चालकांवर रेवदंडा पोलिसांनी दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला.

रेवदंडा येथे बुधवार दि. १३ ऑंगस्ट रोजी आराध्य दैवत श्री मारूतीरायांच्या पालखी उत्सव साजरा करण्यात येत असताना, दुपारी दुपारी १२.३० चे सुमारास बाजारपेठेतून पालखी मिरवणूकीतील भाविकांचा उपस्थिताच्या सुरक्षीतेची पर्वा न करता, काळया रंगाची फिल्म बसवलेली एमएच/१२ क्यूवाय/२२६६ ही स्विप्ट कार वाहन चालकांनी भरधाव वेगाने चालवित नेली. सदर बाब रेवदंडा पोलिसांचे लक्ष्यात येताच, एएसआय .खोत व हवालदार एस.अे. गव्हाणे यांनी भरधाव स्विप्ट कारचा पाठलाग करून अडविले व वाहनचालकांस ताब्यात घेतले.



वाहन चालक प्रतिक बाळासाहेब भालेराव यांचे विरोधात रेवदंडा पोलिसांनी वाहतुक शाखे मार्फत कारवाई करून त्यांचे कडून ५२५० रूपये दंड वसुल केला

## इंदापूरात बांगलादेशींची धरपकड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलिसांनी बांगलादेशी घुसखोरांविरोधातील मोहीम अधिक तीव्र केली आहे. जिल्हयातील इंदापूर इथं माणगाव पोलीसांनी दोन बांगलादेशी घुसखोरांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये एका महिलेचा समावेश आहे.



इंदापूर गावातील दळवी चाळीच्या परिसरात दोन व्यक्ती संशयास्पद हालचाली करत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळताच, पोलिसांनी तात्काळ पथकासह तेथे धाव घेतली. १३ ऑगस्ट रोजी सकाळीच पोलिस पथक दळवी चाळीत दाखल झाले. माजिदा बेगम मोहम्मद जहांगीर आलम (३८ वर्षे), ग्राम मेरेडिया भुईयापारा, पोस्ट ऑफिस खिलगाव, राज्य ढाका आणि रसेल मोहम्मद फारूक हुसेन (२९ वर्षे), रा. श्रीरामपूर, पो. झिकरगाछा, जिल्हा जेशोर, हे दोन्ही बांगलादेशी नागरिक कोणताही वैध व्हिसा, पासपोर्ट किंवा परवानगीशिवाय भारतात प्रवेश करून वास्तव्य करत होते.

दोन्ही घुसखोरांविरुद्ध विदेशी नागरिक कायदा व इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना हद्दपार करण्याची कार्यवाही सुरू आहे., या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुप्तचर विभागाची सजगता अधोरेखित झाली आहे.

## अखेर तहसीलदारांच्या मध्यस्थीने रस्त्याचे काम मार्गी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रीस येथील रस्ता खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मध्यस्थीने पुन्हा बनविण्यात आल्याने रहिवाशी यांनी तहसीलदार अभय चव्हाण यांचे आभार व्यक्त केले आहेत.



दांडफाटा ते आपटा या रस्त्यावर रीस गावच्या हद्दीत रस्त्यालगत असणाऱ्या निशिगंधा रहिवाशी सोसायटी व खाजगी मालक यांची जमीन असून दोघांच्या मधील रस्त्यावरून वाद निर्माण झाला होता, या रस्ता बाबत तहसीलदार खालापूर यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली होती.खाजगी मालक असलेले भाकरे डेव्हलपर्स यांनी ही जागा विकसित करण्यासाठी रस्ता सुरू केला होता, त्यास निशिगंधा सोसायटी यांनी हरकत घेतली होती.

खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. दोघांशी चर्चा केली.रस्ता करण्याचे भाकरे डेव्हलपर्स यांनी मान्य करून कच्चा रस्ता ऐवजी सिमेंटचा रस्ता तयार करून दिला. येथील रहिवाशी आनंद व्यक्त केला.

## ब्राह्मण मंडळ रोहातर्फे आमदार जाधव यांच्या वक्तव्याचा निषेध; कायदेशीर कारवाईची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांनी ब्राह्मण समाजाविरोधात केलेल्या आक्षेपार्हय विधानाचा गुरुवारी सकाळी ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे निषेध व्यक्त करण्यात आला,



रोह्याच्या ऐतिहासिक राम मारुती चौकात आ. भास्कर जाधव यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी आग्रही मागणी करणारे पत्र ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे यावेळी उपविभागायीय अधिकारी रोहा व पोलीस प्रशासनाला देण्यात आले.यावेळी सचिव निखिल दाते तसेच कमिटी सदस्य .प्रतीक पाटणकर यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी ब्राह्मण मंडळ रोहा अध्यक्ष अमित आठवले, सचिव निखिल दाते, सौ. स्वाती पेंडसे, स्मृती जोशी, राजश्री आठवले, गिरीश पेंडसे, चंद्रशेखर जोशी, सुमित रिसबुड,प्रतीक पाटणकर,प्रज्वल बापट, जयेश गोडबोले, मृणाल पेंडसे, मानसी दाते, चिंतामणी गोडबोले, सचिन आठवले, प्रकाश जोशी आदिंसह समाजबांधव मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## रेल्वेत विसरलेली पैशाची पिशवी परत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्टेशन येथे दिवस पाळी ड्युटीवर असताना कर्जतला येणाऱ्या दुपारच्या ११. ५५ च्या लोकलमध्ये एक काळया रंगाची प्लास्टिक पिशवी राहिली असल्याचे कळविण्यात आले. त्यानुसार पोलीस शिपाई गोरख मासाळ व महिला होमगार्ड मोहिनी जाधव, कल्याणी काळेकर, प्रणाली गोळे यांनी त्या लोकल गाडीची तपासणी केली असता ती पिशवी मिळाली. त्यामध्ये कागदपत्रे व २१ हजार रूपये रोख रक्कम होती.ही पिशवी ज्यांची पिशवी विसरून राहिली होती त्या सय्यद जावेद जफर आबीदी रा. बदलापूर यांना परत केली.



## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पनवेल :** परिसरात राहणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणाने १६ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंधातून तिच्यासोबत मंदिरात लग्न करून लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. कर्जत पोलिसांनी याप्रकरणी २४ वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलिसांकडे वर्ग केला आहे.

हा तरुण पनवेलमधील करंजाडे भागात राहण्यास आहे. वर्षभरापूर्वी त्याने पीडित मुलीसोबत मैत्री करून तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर पीडित मुलीसोबत मंदिरात लग्न करून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने गेल्या जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत तिला त्याच्या घरी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या प्रकरातून ती गरोदर राहिली. गेल्या आठवड्यात पीडित मुलीच्या कुटुंबीयांना ही बाब समजल्यानंतर त्यांनी कर्जत पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या तरुणावर गुन्हा दाखल केला. आता हा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

## विविध ग्रामपंचायतीत भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वी ध्वजवंदन

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

राज्यात हर घर तिरंगा अभियान साजरा करणेबाबत, हर घर तिरंगा अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम उपक्रमांचे अयोजन करण्याबात केंद्र शासनाकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत, तीन टप्प्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते,त्यानुसार आज खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींनी तिसऱ्या टप्प्यातील कार्यक्रम अंतर्गत ग्राम पंचायत कार्यालयासमोर ध्वज वंदन करण्यात आले.

तीन टप्प्यात हा कार्यक्रम साजरा होत आहे.तिसरा, शेवटचा आणि महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यात शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक घरावर तसेच शासकीय, निमशासकीय सहकारी खाजगी आस्थापना कार्यालय ठिकाणी राष्ट्रध्वज १३,१४ व १५ ऑगस्ट रोजी फडकविण्यात येणार असून आज ग्राम पंचायत कार्यालयावर ध्वज वंदन करण्यात आले.

ग्रुप ग्राम पंचायत वासांबे मोहोपाडा येथे सरपंच उमा मुंढे,ग्राम पंचायत वावंढळ येथे सरपंच सुहास कदम, आसरे येथे सरपंच बळीराम जांभळे, चौक येथे रितू ठोंबरे, लोधीवली येथे पूजा तवले, वावर्ले येथे सरपंच प्रिया प्रफुल्ल विचारे, टेंभरी येथे सरपंच रमेश गायकवाड,कलोते येथे ग्राम पंचायत अधिकारी म्हसकर उपस्थित होते




### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH-46-BJ1090 चे मालक **विजय तुकाराम बारवे** यांचे तारीख २८/०६/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी दर्शना विजय बारवे, ६०४ गौरी जानकी सी एच एस सेक्टर २१ प्लॉट नंबर १५ उलवे नवी मुंबई ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – दर्शना विजय बारवे**
**पत्ता–** ६०४ गौरी जानकी सी एच एस सेक्टर २१ प्लॉट नंबर १५ उलवे नवी मुंबई ४१०२०६

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/AWO/2018/3375 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BF7368 चे मालक **शाहाबाज रियाज शेख** यांचे तारीख २४/०६/२०२४ रोजी निधन झालेले आहे.

मी समिदा रियाझ शेख, पत्ता : ६०४ गौरी जानकी सी एच एस सेक्टर २१ प्लॉट नंबर १५ उलवे नवी मुंबई ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – समीदा रियाज शेख**
**पत्ता–** ६०४ गौरी जानकी सी एच एस सेक्टर २१ प्लॉट नंबर १५ उलवे नवी मुंबई ४१०२०६

### रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय–०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/विद्युत/तृतीय नि.सु/८०१/२०२५– २६ दिनांक : १४–०८–२०२५

### तृतीय जाहीर निविदा सूचना

रोहा नगर परिषद रोहा यांजकडून रोहा नगर परिषदेच्या विद्युत विभागास खालिल नमुद केलेल्या कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून फेर निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसारा रक्कम (रुपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेस विद्युत साहित्य पुरवठा करणे. | १०००० | १००० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत |
| ३. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या मालकिच्या नदी संवर्धन गार्डन मधील वार्षिक विद्युत देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| ४. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या डम्पिंग ग्राऊन्ड (क्षेपण भुमी) येथील वार्षिक विद्युत देखभाल व दुरूस्ती करणे. | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |

**निविदा अटी/शर्ती :–**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १८–०८–२०२५ पासून २६–०८–२०२५ रोजीपर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.
२) याकामी बयाणा/इसारा रक्कम रोखीने दिनांक १८–०८–२०२५ पासून २६–०८–२०२५ रोजी पर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करावी.
३) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोठ्यात लखोटा क्र.१ व लखोटा क्र.२ सिलबंद करून दोन्ही लखोटे एका मोठ्या लखोट्यामध्ये सिलबंद करून अशा लखोठ्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद, रोहा, यांचे कार्यालयात दिनांक १८–०८–२०२५ पासून २६–०८–२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी दाखल करता येतील.
४) निविदेतील दर हे जी.एस.टी. वगळून इतर करांसहित असावेत. बिलाची आकारणी करतेवेळी जी.एस.टी. अनुज्ञेय राहील.
५) लखोटा क्रमांक १ उघडून निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदा बाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदांचा लखोटा क्रमांक २ शक्यतो दिनांक २६–०८–२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा किंवा प्रशासकिय सोईनुसार निविदाधारकांसमोर किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींसमोर करणेत येईल
६) कोणतेही कारण नमुद न करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.
७) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध आसेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.
८) निविदे संदर्भात काही माहिती हवी असल्यास कार्यालयिन वेळेत नगर परिषद कार्यालयातील विद्युत विभागात संपर्क करून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घ्यावी.

सही/–
( अजयकुमार एडके)
मुख्याधिकारी
रोहा नगर परिषद

# विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या सहभागातून नेरळमध्ये भव्य तिरंगा यात्रा



**नेरळ : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हर घर तिरंगा अभियानाच्या निमित्ताने नेरळमध्ये गेली दोन दिवस देशभक्तीचा जोश अनुभवायला मिळाला. भाजप नेरळ शहर मंडळ अध्यक्ष नरेश उर्फ पपू मसणे यांच्या पुढाकाराने १३ आणि १४ ऑगस्ट रोजी दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आले असून १४ ऑगस्टच्या तिरंगा यात्रेच्या आधी, १३ ऑगस्ट रोजी नेरळ हुतात्मा चौक परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या उपक्रमाद्वारे स्वच्छता आणि देशभक्ती यांचा संदेश देत परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यात आले.यामध्ये शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग नेत्र दिपून घेणारा ठरला.

कर्जत तालुक्यात भारतीय जनता पार्टी हर घर तिरंगा अभियानाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवत असून स्वच्छतेचे महत्त्व देखील पटवून देत स्वतंत्र उत्सव साजरा करीत आहे.दरम्यान १५ ऑगस्ट या ७९ व्या स्वतंत्र दिनी १४ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय जनता पार्टीचे नेरळ शहर मंडल अध्यक्ष नरेश मसणे यांनी सकाळी १० वाजता माथेरान प्रवेश द्वारा असलेल्या हुतात्मा स्मारक येथून तिरंगा यात्रेला प्रारंभ केला. ही यात्रा नेरळ बाजारपेठेतील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत नेत्रदीपक वातावरणात पार पडली.

शहरातील व्यावसायिक, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि असंख्य देशप्रेमी नागरिकांनी या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.तसेच शहरातील रेम्बो, एल.ए.ई.एस., हाजी लियाकत स्कूल, शारविल, विद्या विकास मंदिर, कन्या शाळा, उर्दू शाळा, मराठी माध्यमिक, नेरळ विद्या मंदिर, उच्च माध्यमिक विद्यालय अशा अनेक शाळांच्या सुमारे १,२०० विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेऊन घोषणाबाजी करत सहभाग घेतला.

या देशभक्तीच्या लाटेने नेरळचा प्रत्येक कोपरा भारावून गेला होता. स्वातंत्र्य अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हर घर तिरंगा उपक्रमाद्वारे नागरिकांना घराघरात तिरंगा फडकावण्याचे आवाहन करण्यात आले. स्वच्छता आणि तिरंगा हे राष्ट्रीय एकतेचे प्रतीक असल्याचा संदेश दोन्ही दिवसांच्या उपक्रमातून देण्यात आला होता.

या दोन दिवसांच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष नरेश मसणे यांना सरचिटणीस वैभव भगत व नरेंद्र कराळे, महिला मोर्चा अध्यक्षा नम्रता कांदळगावकर, युवा मोर्चा अध्यक्ष जयेश जोशी आणि तिरंगा रॅली संयोजक किशोर खंडू ठाकरे यांनी प्रभावी सहकार्य केले.

## मुरुड तालुका भाजपतर्फे तिरंगा मोटरसायकल रॅली

**मुरूड : प्रतिनिधी**

हर घर तिरंगा घर घर तिरंगा या अभियानांतर्गत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आणि 'हर घर तिरंगा' अभियानाचा जनजागृती हेतू समोर ठेवून भारतीय जनता पार्टी पक्षाच्या वतीने मुरुड शहरात तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

आज सकाळी भाजपच्यावतीने श्रीराम बँक येथुन तिरंगा बाईक रॅलीची सुरुवात होऊन मुख्य बाजारपेठ, चिखलपाखाडी नाका,मारुतीनाका, शेगवाडा येथील कंधारे यांच्या निवासस्थान पर्यत अशी रॅली काढण्यात आली. तद्नंतर तिरंगा ला सलामी देऊन राष्ट्रगीत सादर केले.'भारत माता की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणांनी वातावरण देशभक्तीमय केले. भाजप पक्षाच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने वातावरण निर्मिती व जनजागृती करण्यात आली.

या वेळी भाजप तालुका अध्यक्ष– शैलेश खाते, उपाध्यक्ष–धर्माजी हिरवे,शहर उपाध्यक्ष– दिपक चोडणेकर, अतुल पाटील, सरचिटणीस– दिपक गिते, युवा मोर्चा अध्यक्ष– हरेश आरकशी, महेश म्हात्रे, तालुका सदस्य– मंगेश मोहिते, चिटणीस– अनिल नांदगावक, बाळा भगत,राजेश मांदाडकर,अजय वाडकर, महेंद्र चौलकर, सुधीर पाटील, किशोर घोसाळकर,संदिप घरत आदिंसह कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक उत्साहाने सहभागी झाले होते.



## कैरे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बाबा ग्रुप ऑफ कंपनीचे डायरेक्टर पी. प्रभाकरन यांच्या वाढदिवसानिमित्त कैरे गावचे माजी उपसरपंच सुरेशदादा पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपण समजाकरिता काही तरी देणे लागतो, या उदात्त हेतूने रायगड जिल्हा परिषद शाळा कैरे येथील शालेय विद्यार्थ्यांना स्वखर्चातून गणवेश वाटप केले.त्याबद्दल शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंदानी त्यांचे आभार मानले. या वेळी विध्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.

या कार्यक्रमप्रसंगी अविनाश पाटील, संतोष ठोंबरे पद्माकर पाटील, उमेश ठोंबरे, नंदकुमार पाटील, हरेश पाटील, राकेश गोडीवले, इंजि. रोहित मालकर उपस्थित होते.




# अलिबाग तालुका भाजपतर्फे दहीहंडी उत्सवाचे आयोजन

**अलिबाग: प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी अलिबाग तालुकातर्फे शनिवारी (दि. १६) दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग येथील भाजपा जुन्या कार्यालयासमोर हा दहीहंडी उत्सव होणार आहे. या दहीहंडीमध्ये उत्सवात अलिबाग तालुक्यातील ६२ पुरूष व महिला गोवींदापथके सहभागी होणार आहेत. यात पंधरा लाख रूपयांची रोख बक्षीसे दिली जाणार आहेत, अशी महिती भाजपा दक्षीण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी शुक्रवारी (दि. १४) दिली.

चेढरे बायपास येथील भाजप दक्षीण रायगड जिल्हा कार्यालयात दहीहंडी उत्सवात देण्यात येणार्या ट्रॉफिंचे अनावरण करण्यात आले . त्यावेळी ॲड. महेश मोहिते यांनी ही माहिती दिली. भाजपा दक्षीण रायगड जिल्हा महिला आघाडी आध्यक्ष सौ. चित्रा पाटील, अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, मध्य अलिबाग तालुका अध्यक्ष रोशन भगत, दक्षीण अलिबाग तालुका अध्यक्ष अशोक वारगे, सुनिल दामले, संतोष साखरे, राजेश पाटील आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते.



भाजपा अलिबाग तालुकातर्फे गेली सात वर्षे अलिबाग शहारात दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते. यंदा या उत्सवाचे आठवे वर्ष आहे. पुरूष गटात प्रथम क्रमासाठी २ लाख २२ हजार रूपये रोख व ट्रॅफी बक्षीस देण्यात येणार आहे. महिला गटातील प्रथम क्रमांकाकरीता १ लाख ११ हजार रूपये रोख व ट्रॅफी पक्षीस देण्यात येणार आहे. पुरूषांमध्ये सहा थरांच्या सलामीला ११ हजार १११ रूपये बक्षीस देण्यात येणार आहे. महिला गटात पाच थरांच्या सलामीला १५ हजार रूपये रूपये रोख बक्षीस देण्यात येणार आहे. एकूण पंधरा लाख रूपये रोख रकमेची बक्षीसे देण्यात येणार आहेत.

लहान बालगोपाळांसाठी फन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अलिबागमधील मेटपाडा व गोंधळपाडा येथील गोवींदा पथकांनी आठ थर लावले होते त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती ॲड. महेश मोहिते यांनी दिली.

माजी खासदार किरीट सोमया, आमदार महेंद्र दळवी, पोलीस अधीक्षक आचल दलाल, आंतरराष्ट्रीय शरीससौठवपटू हरमीत सिंग, अभिनेत्री श्वेता खरात, सोनाली पाटील,पार्श्वगायक चेतन लोखंडे, एसआरए प्रोडक्शनचे राज शिंदे हे यावेळी उपस्थित राहणार आहेत. अलंकार पाटील प्रस्तूत दर्याचा राज हा माराठी वाद्यवृदाचा कार्यक्रम देखील होणार आहे, असे ॲड. महेश मोहिते यांनी सांगितले.




## रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशानुसार, रायगड जिल्ह्यात १३ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती

रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र द. सावंत आणि वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड–अलिबाग सचिव तेजस्विनी निराळे यांनी दिली.

या राष्ट्रीय लोक अदालतीत जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली विविध प्रकरणे सोडविण्यात येणार आहेत. यामध्ये दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात भरपाई प्रकरणे, विवाह व कौटुंबिक वाद, बँक व वसुली विषयक प्रकरणे, वीज देयके, पाणीपट्टी, तसेच शासकीय विभागांशी संबंधित वादांचा निपटारा करण्यात येईल.

लोक अदालतीत प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करून वेळ, खर्च आणि तणाव वाचविण्याची संधी मिळणार असल्याने अधिकाधिक नागरिकांनी आपल्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड–अलिबागतर्फे करण्यात आले आहे.

लोकनेते मा. खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त
श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित
रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा
७५ लोकनेते श्री रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव
भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी भजन स्पर्धेचे आयोजन!
रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे!
शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५.
वेळ – सकाळी ९.०० ते सायं. ७.००
स्थळ – श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल, प्लॉट नं. ४७५, मार्केट यार्ड.पनवेल.

प्रवेश अर्ज
१) भजन मंडळाचे नाव ______
२) भजन स्पर्धक मंडळाचा पत्ता ______
३) संपर्क क्रमांक ______
४) गायकाचे नाव ______
५) मृदंग वादकाचे नाव ______
६) तबला वादकाचे नाव ______

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५.
पुरुष खुलागट - महिला खुलागट
प्रथम पारितोषिक ५१,०००/- सन्मानचिन्ह
द्वितीय पारितोषिक २५,०००/- सन्मानचिन्ह
तृतीय पारितोषिक १५,०००/- सन्मानचिन्ह
उत्तेजनार्थ पारितोषिक ७,०००/- सन्मानचिन्ह
उत्कृष्ट पखवाज वादक ७,०००/- सन्मानचिन्ह
उत्कृष्ट तबलावादक ७,०००/- सन्मानचिन्ह
स्पर्धा संपन्न झाल्यानंतर लगेचच स्पर्धेचा निकाल जाहीर करून बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.
अधिक माहितीसाठी संपर्क
सागर राजे - ९२२४३४४१३६, नारायण बुवा पाटील - ७७१५८३५४२४, उमेश बुवा चौधरी - ९३२४८२४२०५, चंद्रकांत मने - ९७६८६५६४८४, विनोद तोडेकर - ७०४५८२२५४८, जगदीश म्हात्रे ९३२६८१२१९६, पुनमताई ठाकूर - ७२०८७७६००५, पवन राजे - ९२२१०९७३३७, अभिषेक पटवर्धन - ९०२९५८०३४३, अनिल कोळी - ९१६७४७४५०७, मच्छिंद्र पाटील - ९००४०४८६३, डॉ. शैलेश वाजेकर - ९८६७२९६८५०

स्पर्धेची नियमावली
१) भजन स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्यात होईल.
२) प्राथमिक फेरी हि ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येईल.
३) प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या सर्वोत्तम पुरुष १५ व महिला १५ स्पर्धक भजन मंडळींना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात येईल.
४) प्राथमिक फेरीत भाग घेण्यासाठी २ ते ३ मिनिटांचा साउंड सिस्टिम न वापरता शुटींग केलेला नॉन एडिटेड व्हिडीओ 9167474507 या नंबरवर व्हॉट्सअप करावा. सदर व्हिडिओ आणि मंडळाची माहिती (मंडळाचे नाव, सहभागी कलाकारांची नावे इत्यादी, भजन स्पर्धेच्या किमान सात दिवस अगोदर पाठवावी).
५) अंतिम फेरीत निवड झाल्यावर प्रत्यक्ष सादरीकरण करताना मुख्य गायक-वादकांसह कमीत कमी ६ जणांचा आणि जास्तीत जास्त १२ जणांचा समावेश असावा.
६) अंतिम फेरीत भजन सादरीकरणासाठी फक्त २० मिनिटांचा निर्धारित वेळ असणार आहे.
७) श्लोक, भजन, एक अभंग आणि एक गौळण सादर करणे आवश्यक आहे.
८) सादरीकरणासाठी घेतलेले अभंग आणि गौळण हे संताचेच असावेत. (रचलेले अभंग, स्वरचित काव्य, गौळण, भक्तिगीत चालणार नाहीत) अभंग सादरीकरण करताना फिल्मी चालीत अभंग गाऊ नये,
९) निवड झालेल्या मंडळींनी निर्धारित वेळेच्या एक तास अगोदरच उपस्थित राहणे आवश्यक आहे.
१०) व्यासपीठावर बसण्याच्या अगोदरच आपापली वाद्ये सुरात मिळवून ठेवावीत. फक्त आवाज तपासून घेण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.
११) स्पर्धेसाठी लागणारे साहित्य आणि वाद्ये आपण स्वतःची आणावी.
१२) तबला, पेटी, टाळ, पखवाज हे चार आणि कोरस तीन असे एकूण ७ जण असावेत.
१३) प्राप्त परिस्थितीनुसार कार्यक्रमात फेरबदल करण्याचा आयोजकांना अधिकार राहिल.
१४) परिक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहिल. परिक्षकांबरोबर कोणत्याही कारणाने वाद घालता येणार नाही.
१५) आवश्यक असल्यास इतर काही नियम कार्यक्रम स्थळी समजविण्यात येतील.
१६) प्राथमिक फेरीत भाग घेतल्यानंतर फोन करुन विचारणा करु नये. अंतिम यादी प्रसारीत करण्यात येईल.
१७) स्पर्धेतील गायक, वादक, चकवा वादक किंवा कोणतेही कोरस दुसऱ्या मंडळात सहभागी होवू शकणार नाही.
१८) पारंपारिक भजनातील साहित्याचा वापर करता येईल. (इलेक्ट्रॉनिक तानपु-याचा वापर करावयास हरकत नाही.)
१९) भजन सादरीकरण करताना पारंपारिक पोषाख असावा.
सुचनाः भजन स्पर्धेत सहभागी झालेल्या मंडळाचे सादरीकरण कसे झाले याबद्दल परिक्षक LIVE समिक्षा करतील. तसेच सहभागी झालेल्या कलाकारांना योग्य त्या प्रतिक्रिया आणि आवश्यक असल्यास सुचना करतील, जेणेकरुन त्यांना प्रोत्साहन मिळेल, शिवाय निकाल देताना पारदर्शकता जपता येईल.

+91 22 41498855
www.hiranandaniexclusive.com

hiranandani communities
a niranjan hiranandani initiative

# HIRANANDANI FORTUNE CITY PANVEL

## 2, 3 & 4 BHK Homes




### TOWNSHIP AMENITIES

Hiranandani Trust School | Medical Center | Landscaped Garden
Pedestrian Friendly Tree - Lined Avenues | Supermarket | Retail Outlets
Restaurants | Shuttle Bus Service | Hakone Gaming Center

The project has been registered via MahaRERA registration numbers: **Jasmine: P52000055578, Mayflower: P52000054617, Marigold: P52000054616** is available on the website https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. PDPL/ developer secures a credit facility from ICICI Bank and Aditya Birla Finance Limited (collectively, "Lenders"), with Beacon Trusteeship Limited as Security Trustee. This facility is for the development projects at Sector B, Golden Willows ("RZ-02") and Sector D ("RZ-05"). The developer has fully repaid the previous loan managed by Axis Trustee Services Limited for Axis Bank, State Bank of India, and Punjab National Bank Housing Finance Ltd. Upon sale of individual flats in the Projects, Beacon Trusteeship Limited will issue the requisite Release of Charge (ROC) or No Objection Certificate (NOC). *T&C Apply.

JASMINE | MAYFLOWER | MARIGOLD



www.paradisegroup.co.in
MAHARERA NO.
PHASE III - P52000053727
Available on maharera.maharashtra.gov.in
LONDON DREAM,
NOW MUMBAI'S REALITY
10 MINS
CLOSEST TOWNSHIP TO MTHL & NAVI MUMBAI INTL. AIRPORT
NEW TOWER
LLOYDS
Artist's Impression
PHASE 1 - READY POSSESSION
SAI
WORLD CITY
PANVEL
PROJECT HALLMARKS
38 Acre Mega Township | G+33 Storeyed Towers | 2, 2.5, 3 & 4 BHK Luxury Homes
Themed Landscaping | 50,000 Sq.Ft. Club Vegas | World–class Amenities
LOCATION ADVANTAGES: Navi Mumbai International Airport - 5 Mins. | Mumbai- Pune Expressway - 2 Mins
Panvel Railway Station - 7 Mins | Delhi Public School (DPS) - 5 Mins | Mumbai Trans Harbour Link - 10 Mins
Jawaharlal Nehru Port Trust (JNPT) - 20 Mins | Close proximity to Schools, Malls, Hotels and Banks - 5 Mins
98330 90000 | enquiry@paradisegroup.co.in
Site & Sales Off.: Sai World City, Palaspe Phata Junction, Panvel - 410 206
Disclaimer: All the specifcation, design, facilities, dimensions, etc. are subject to the approval of the respective authorities & developers and would be changed if necessary. The discretion remains with the developers.
PARADISE® GROUP
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization





Developed By
MAHAAVIR
Perfection Since inception
MAHAAVIR LABDHI
BEAUTIFUL SEA FACING 2 & 3 BHK APARTMENT'S
At URAN, Near Atal Setu & Navi Mumbai Airport
India
Happy
Independence Day
NEW LAUNCH
Site Add.: Mahaavir Labdhi located at CTS No.420A, 420B, 420C, 420D and 403, Village Mhatavli, Taluka Uran, Dist. Raigad
Call: 98673 11345 / 022-41572600
MahaRERA Registration No.: P52000045246 & is available on the website https://maharera.mahaonline.gov.in | *T&C APPLY
scan for us:
Corporate Add.: Mahaavir Buildcon LLP, 302-306, Persipolis, Plot - 74, Sector - 17, Vashi, Navi Mumbai 400 703 | www.mahaavir.com






वसा जनसेवेचा...
धार्मिक
पुरस्कार
ईरशाल वाडी मदत
कोरोना काळात मदत
क्रिडा प्रेमी
शैक्षणिक
आरोग्य
सामाजिक
15th Aug
स्वातंत्र्यदिन चिरायू होवो...
जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था
श्री.जे.एम.म्हात्रे
संस्थापक : जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था
श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे
अध्यक्ष : जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था


"Honoring the sacrifices of our heroes on this joyous Independence Day"
HAPPY INDEPENDENCE DAY OF INDIA
SIMRAN MOTORS
EXPERIENCE THE NEW WAY OF LIFE
HURRY UP!
UNFORGETTABLE DEALS ON WHEELS!
"Your Dream Car, Now Within Reach"
Only At SIMRAN MOTORS
TAKE TEST DRIVE AND WIN ASSURED GIFTS
BOOK NOW
Also Available
S-CNG
DRIVE SMART. CHOOSE GREEN.
SPECIAL OFFER
100% On-Road Funding*
Ever Highest Discounts*
Highest Exchange Bonus*
Spot Evaluation*
Affordable EMI*
Low Down Payment*
Visit Your Nearest Maruti Suzuki Simran Motors Today !
*T&C Apply
MARUTI SUZUKI ARENA 9223589145
NEXA 8657759818
MARUTI SUZUKI COMMERCIAL 8691043034
TRUE VALUE 9223161420
OUR PRESENCE :
PANVEL 9223589145
AIROLI 9223161411
CHOWK 9373830579
KARJAT 9223589145
WADKHAL 9223161473
ALIBAG 9223161461
NAGOTHANE 9223161514
MANGAON 9223161426
MAHAD 9767006043
HEAD OFFICE (PANVEL):
Plot No. 2-8, Sector 15, Opp. Garden Hotel, Old Mumbai - Pune Highway,Panvel, Maharashtra 410206


PRAJAPATI
30 YEARS OF LEGACY
30TH PROJECT COMPLETED ON TIME
3 ACRE
RESORT THEMED PROJECT
FULL OC RECEIVED
ACTUAL IMAGE
PRAJAPATI MAGNUM


AUGUST 15TH
India
INDEPENDENCE DAY
"Remembering the struggle for freedom, celebrating India's Independence Day with gratitude"
With best compliments from
gandhar
oil refinery india ltd.
divyol
solutions within solutions
Corporate Office
18th Floor, DLH Park, S. V. Road, Goregaon (w), Mumbai 400062.
Tel : + 91-22-4063 5600. Fax : 91-22-4063 5601
Email : sales@gandharoil.com. website : www.gandharoil.com
Government Recognised Star Export House



"Honoring the sacrifices of our heroes on this joyous Independence Day"
HAPPY INDEPENDENCE DAY OF INDIA
SHREEYASH MATERNITY AND GENERAL HOSPITAL
ORTHOPEDIC TRAUMA AND JOINT REPLACEMENT CENTER
Paediatric Neurology Clinic
State of art infrastructure & equipments
• Fully equipped operation theatres , labor rooms
• Obstetric ultrasonography
• Laparoscopic Gynecological surgeries
• Gynecological oncosurgery
• Fertility treatment
• Pediatric Neurology Consultation
DR RAVINDRA INAMDAR
MD (OBGY)
DR MADHURI INAMDAR
MD,DGO (OBGY)
DR RAMA INAMDAR KULKARNI
DNB (OBGY)
Gynaec Laproscopic Surgery Fellowship (Seoul, Korea)
DR NEHA INAMDAR PATKI
MBBS, DNB Paediatrics, Fellowship In Pediatric Neurology, Hinduja Hosp, Mumbai
COMPREHENSIVE ORTHOPAEDIC TRAUMA, SPINE, JOINT REPLACEMENT AND ARTHROSCOPY CENTRE
DR SOURABH KULKARNI
MS Ortho (KEM Hospital)
Fellow Joint Replacement Surgery (Korea)
Advanced Hip & Knee Surgery Fellow (SICOT)
DR SARANG PATKI
MS Ortho (JIPMER),DNB Ortho
Fellow Arthroscopy , Knee & Shoulder Surgery (Italy)(ISAKOS)
Next To Bank Of India, Vijay Marg, Sector 19, New Panvel East, Navi Mumbai, Maharashtra 410206, contact no: 27452139, 27451411


AUG 15TH
INDIA
INDEPENDENCE DAY
Remembering the struggle for freedom,
celebrating India's Independence Day
with gratitude
WITH BEST COMPLIMENTS FROM
AIS
Asahi India Glass Ltd.


YAMAHA
RACING
Awarded as Most Reliable Engines of The World
With 1 Lakh Km Warranty
RayZR
Street Rally
125 Fi Hybrid
FZS-FI
Hybrid
NAMAN
नमन ऑटो सेल्स
Showroom Sales Head : 8983490970/8108444434
Amol Khane : Shailesh: 8433668559
Panvel - Nandanvan Complex, Opp. Orion Mall


Jawa 42 FJ
yezdi
JAWA
Naman Auto Riders
Opp. Orion Mall Panvel
9819214955
8369117163


inverter Only at Rs 4500/-
INVA MASTER
1500 - TUBULAR
60 Months
Warranty
36 Months
Replacement
& 24 Months
pro rata
48 Months Warranty
24 Months Replacement &
24 Months pro rata
INVA HOMZ
MRF
BRIDGESTONE
apollo
NAMAN
Tyres & Batteries
8451013604/9322041720/9892127383
Authorised Distributor - MRF, Apollo, Bridgestone tyre Exide Batteries &
Microtek Digital Inverter Panvel / Raigad / Vashi
shop no. 31/32 Nandanvan Complex, Opp. Orion Mall, Mumbai-pune road, Panvel
*T&C Apply


15TH AUGUST
Independence
Day of india
"Honoring the sacrifices of our
heroes on this joyous
Independence Day"
WITH BEST COMPLIMENTS FROM
tpv
Thakkar Popatlal Velji Sales Ltd.
Authorised Cement Distributor
Off. No. 2, Neel Presidency, 1st Flr., Opp. M.T.N.L., M.C.C.H. Society,
Panvel. 410206. Raigad. Maharashtra, india
Sales : + 91-22-27453346. Fax. + 91 - 22 - 27468124.
Email. : tpvmumbai@gmail.com Web : www.thakkarcement.com.


स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!!
PRACHIN
Healthcare
शुभेच्छुक
प्राचिन हेल्थकेअर
(मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल)
इमर्जन्सी मॅनेजमेन्ट एक्सपिरियन्स डॉक्टरांची टीम
* ३ स्टेट स्पेशल मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
* ॲडव्हान्स डायग्नोस्टिक मशिनरी ॲण्ड इक्विपमेन्ट
* २४X७ तास पॅथॉलॉजी
* २४X७ कार्डियक ॲम्बुलन्स
* २४X७ ॲक्सिडेन्ट ॲण्ड ट्रॉमा केअर सेंटर
* पुर्णपणे सुसज्जित इंटेसिव केअर युनिट
* २४X७ फार्मसी
* ॲडवान्स टेलीमेडिसन सिस्टम
संचालक
डॉ. मंगेश रा. डाके
(एम. एस. डि. ओर्थो)
डॉ. संगिता मं. डाके
(एम. डि. डि. जी. ओ.)
पत्ता : प्लॉट नंबर ६९/२. स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेलच्या मागे,
एच.ओ. सी. कॉलनी, पनवेल नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२०६
वेबसाईट : prachinhealthcare.com
ईमेल : info@prachealthcare.com
फोन नं. : ०२२७१३३३२५८/५९



आ चंद्र सूर्य नांदो
स्वातंत्र्य भारताचे
स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...
UROLOGY CENTRE
लाईफ लाईन हॉस्पिटल
JOINT REPLACEMENT CENTRE
शुभेच्छुक
डॉ. प्रकाश पाटील (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक)
डॉ. जयश्री पाटील (वैद्यकिय संचालीका)
डॉ. अभितेज म्हस्के (संचालक)
डॉ. केतकी म्हस्के (पाटील) (संचालीका)
डॉ. अजिंक्य पाटील (संचालक)
डॉ. जान्हवी पाटील (संचालीका)
श्री. पराग बेडसे (संचालक)
• आणि लाईफलाईन हॉस्पिटल कर्मचारीवृंद •




HAPPY
INDEPENDENCE DAY
"Honoring the sacrifices of our heroes on this joyous Independence Day"
15TH AUGUST
With Best Compliments From
TechNova




भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
R Jhunjhunwala
Sankara Eye Hospital
डोळ्यांच्या संपूर्ण तपासण्या व विशेष उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध
४७ वर्षांचा अनुभव
स्पेशालिटी सेवा
मोतिबिंदू
काचबिंदू
विट्रियो रेटिना सेवा
कॉरनिया आणि केराटोप्लास्टी
बाल नेत्ररोग आणि स्ट्रॅबिसमस
ऑरबिट आणि ऑक्यूलोप्लास्टी
ऑक्यूलर डायग्नोस्टिक सेवा
व्हिजन थेरपी क्लिनीक
सदैव आपल्या सेवेत उपलब्ध
सोमवार ते शनिवार : स.९.०० ते रा. ८.०० पर्यंत | रविवार व सुट्टी : स.९.०० ते संध्या ६.०० पर्यंत
आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल
प्लॉट नंबर १३, सेक्टर ५-अ, नविन पनवेल (पुर्व), नवी मुंबई, महाराष्ट्र : ४१०२०६
022 - 27484300 7738 7739 14




आ चंद्र सूर्य नांदो
स्वातंत्र्य भारताचे
भारतीय
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
अष्टविनायक हॉस्पिटल
मल्टीस्पेशालिटी अँण्ड सुपर स्पेशालिटी
सर्व अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त
रायगड जिल्ह्यातील प्रथम NABH मानांकित रुग्णालय
NABH
वैशिष्ट्ये
हृदयविकार उपचार केंद्र
मूत्रमार्ग विकार उपचार केंद्र
सर्व लेझर व दुर्बीण शस्त्रक्रिया उपलब्ध
गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया उपलब्ध
कॅथ लॅब उपलब्ध
पत्ता : प्लॉट नं. १०, सेक्टर ६, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, नवी मुंबई ४१०२०६
०२२-२७४५ ३६८१/८३
www.ashtvinayakhospital.in
ashtvinayakhospital@gmail.com